# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र.३

सभावृत्तांत

दिनांक ०६/१०/२०१७ दुपारी १२.०० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे ऑक्टोबर २०१७ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०६/१०/२०१७ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रीय कार्यालयाच्या “छत्रपती शाहू महाराज सभागृह” येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. कदम शशिकांत गणपत | सभापती |
| २) | मा. श्रीमती दर्शले रेखा राजेश | सदस्या |
| ३) | मा. श्रीमती ममता विनायक गायकवाड | सदस्या |
| ४) | मा.श्री.कामठे तुषार गजानन | सदस्य |
| ५) | मा.चोंधे आरती सुरेश | सदस्या |
| ६) | मा.कस्पटे संदिप अरूण | सदस्य |
| ७) | मा.कुटे निर्मला संजय | सदस्या |
| ८) | मा.श्री. सागर आंगोळकर | सदस्य |
| ९) | मा.श्रीमती मुंढे उषा अंकुश | सदस्या |
| १०) | मा. श्रीमती लोखंडे चंदा राजू | सदस्या |

-----------------

याशिवाय, मा. सिताराम बहुरे, क्षेत्रीय अधिकारी, तथा प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा.शिरीष पोरेडी, प्रभारी कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा. संदेश चव्हाण, कार्यकारी अभियंता विद्युत, मा.अशोक बोनगीर, लेखाधिकारी, मा. सुर्यकांत मोहिते, उपअभियंता, जलनि:सारण, मा. माधव सोनवणे, उपअभियंता, विद्युत, मा. अजय जाधव, मा. एस.एस. गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. पाटील एस. वाय.,मा. संध्या वाघ, उपअभियंता, स्थापत्य, मा. भाऊसाहेब साबळे, मा. राजेंद्र जावळे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा. राजेंद्र जावळे, उपअभियंता, झोनिपू स्थापत्य, मा.व्हि.एस.गेंगजे, क्रीडा निरीक्षक, मा. रोकडे जयवंत, मा. मुलाणी बी.एम., मा. ढोरे बी.आर. कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. मोरमारे शरद, मा.कुतवळ एस.यु., मा. प्रवीण धुमाळ, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. भालेराव यु.ए. कनिष्ठ अभियंता विद्युत, मा. विजय सोनवणे, मा. खोत एस.एच. कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, मा. शशिकांत मोरे, आरोग्य निरीक्षक, मा. सी.सी. मोरे. हॉर्टीकल्चर सुपरवायझर, मा. पटेल जे.व्ही. उद्यान निरीक्षक, मा.खैरे जी. एन, उद्यान सहाय्यक, मा.लक्ष्मण काळे, मा. एम.पी. सुभेदार, अतिक्रमण निरीक्षक, इ. अधिकारी उपस्थित होते.

-----------

**मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव** : दिनांक ०६/१०/२०१७ रोजीची माहे ऑक्टोबरच्या नियमित ड प्रभाग समिती सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

**मा. सभापती** : आजच्या सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता देणेत येत आहे.

**मा. सचिव, सभा शाखा** :- सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेकामी मान्यता मिळावी.

**मा. सभापती** :– सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत येणेकामी मान्यता आहे.

**सन्मा. सदस्यांच्या मागणीप्रमाणे व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने सभेमध्ये खालील प्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.**

**विषय क्र.१**: मौजे पिंपळे निलख येथील सर्व्हे नं. २७ मधुन १८ मीटर रुंद रस्ता हा मौजे वाकड येथील सर्व्हे नं. २१० मधुन ४५ मीटर रस्त्यापर्यंत अर्थात ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले उद्यान शेजारील बाजूने ते पार्कस्ट्रीट (कस्पटेवस्ती) वाकड पर्यंतचा भाग महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये १८ मीटर NON DP रस्ता घोषित करणेबाबत

**विषय क्र.** २ : प्रभाग क्र. २६ पिंपळे निलख मधील शांती निकेतन सोसायटी व मिलिंद सोसींग सोसायटी येथील अंतर्गत रस्ते महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ नुसार घोषित करणेत येऊन सदर रस्ता विकसित करणेबाबत

**तदनंतर मा. ड प्रभाग समिती माहे ऑक्टोबर २०१७ चे नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.**

**मा. सचिव, सभा शाखा** : :- मागील सभा कार्यपत्रिका क्र. २ माहे सप्टेंबर २०१७ च्या मासिक सभेचा सभावृत्तांत कायम करणे

**मा. सभापती** : मागील सभा कार्यपत्रिका क्र. २ माहे सप्टेंबर २०१७ च्या मासिक सभेचा सभावृत्तांत कायम करण्यात येत आहे.

**मा. सचिव, सभा शाखा** : माहे ऑक्टोबर २०१७ च्या कार्यपत्रिका क्र. ३ वर कोणतेही विषय नसल्याने सन्मा. नगरसदस्यांच्या मागणीनुसार व मा. सभापती यांचे मान्यतेने दिनांक ०६/१०/२०१७ रोजीच्या सभेमध्ये ऐन वेळी दाखल केलेले विषयांवर खालील प्रमाणे मंजुरी देणेत आली.

विषय क्र. १ ठराव क्र. ५

दिनांक ०६/१०/२०१७ विभाग: नगररचना विभाग

सूचक : मा. संदीप अरुण कस्पटे अनुमोदक : मा. निर्मला संजय कुटे

संदर्भ : मा. संदीप अरुण कस्पटे यांचेकडील दि. ६/१०/२०१७ रोजीचा प्रस्ताव

मौजे पिंपळे निलख येथील सर्व्हे नं. २७ मधुन १८ मीटर रुंद रस्ता हा मौजे वाकड येथील सर्व्हे नं. २१० मधुन ४५ मीटर रस्त्यापर्यंत अर्थात ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले उद्यान शेजारील बाजूने ते

पार्कस्ट्रीट (कस्पटेवस्ती) वाकड पर्यंतचा भाग महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये १८ मीटर NON DP रस्ता घोषित करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

----------------

विषय क्र. २ | ठराव क्र. ६

दिनांक ०६/१०/२०१७ | विभाग: नगररचना विभाग

सूचक : मा.आरती सुरेश चोंधे | अनुमोदक : मा. ममता गायकवाड

संदर्भ :मा. आरती सुरेश चोंधे यांचा दिनांक ६/१०/२०१७ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २६ पिंपळे निलख मधील शांती निकेतन सोसायटी व मिलिंद सोसींग सोसायटी येथील अंतर्गत रस्ते महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ नुसार घोषित करणेत येऊन सदर रस्ता विकसित करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

----------------

त्यानंतर मा. सभापती यांचे मान्यतेने सन्मा. नगरसदस्यांनी ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत कार्यरत विविध विभागांकडील कामकाजाबाबत त्यांचे मत प्रदर्शित केले.

**मा. सभापती**: सर्व विभागप्रमुखांनी सन्मा. नगरसदस्यांनी मांडलेल्या प्रत्येक मुद्यांवर आवश्यक ती कार्यवाही करावी व त्याबाबत संबंधित नगरसदस्यांना आवश्यक माहिती देऊन प्रभागातील त्यांचे विभागाशी संबंधित तक्रारींचा विनाविलंब निपटारा करावा अशा सूचना देतो तसेच सर्व उपस्थितांचे आभार मानुन माहे सप्टेंबर २०१७ ची प्रभाग समिती सभा संपल्याचे जाहीर करतो.

सही/-
(कदम शशिकांत गणपत)
**सभापती**
ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी ४११०१७

सही/-
**प्रशासन अधिकारी तथा सचिव**,
(सभाशाखा),
ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/ ४७ /२०१७
दिनांक – ०८/११/२०१७